# Famous marathi mhani

विद्यार्थीमित्रांनो आपली मराठी भाषा ही तिच्या शब्दसंपत्तीने व साहित्यिकांच्या योगदानाने अत्यंत समृद्ध अशी भाषा आहे. या भाषेचे एक प्रमुख आणि आकर्षक वैशिष्ट्य म्हणजे **'Marathi Mhani'.** आता म्हणी म्हणजे काय सांगायचे झाले तर एखादी गोष्ट सांगितलेले मोठे शहाणपण किंवा पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या अनुभवाचे सार होय. मित्रांनो या म्हणी केवळ भाषेचे सौंदर्य वाढवत नाहीत, तर त्या आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहेत.

रोजच्या संवादात किंवा लेखनात **मराठी म्हणींचा** वापर केल्यास आपले म्हणणे अधिक प्रभावीपणे मांडता येते. गावरान बोलीपासून ते प्रमाण मराठी भाषेपर्यंत सर्वत्र या म्हणींचा सढळ हाताने वापर होतो. म्हणूनच, मराठी भाषेवर खऱ्या अर्थाने प्रभुत्व मिळवण्यासाठी म्हणींचा अर्थ आणि त्यांचा योग्य वापर समजून घेणे अत्यंत आवश्यक असते.

महाराष्ट्र शासनाच्या विविध स्पर्धा परीक्षांच्या (जसे की MPSC, राज्यसेवा, संयुक्त गट ब आणि क, तलाठी भरती, पोलीस भरती आणि इतर सरळसेवा परीक्षा) दृष्टीने विचार केल्यास, मराठी व्याकरण आणि शब्दसंग्रह या विभागाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सर्व परीक्षांमध्ये 'म्हणी आणि त्यांचे अर्थ' या घटकावर २ ते ३ प्रश्न हमखास विचारले जातात. म्हणून तर तुम्ही स्पर्धा परीक्षेची तयारी करत असाल तर या लेखात दिलेल्या **Famous Marathi Mhani** एकदा वाचून नक्की जा

## Famous marathi mhani

चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे - प्रत्येकाचा दिवस (वेळ/अधिकार) कधी ना कधी येतोच.

थोरा घराचे श्वान सर्व ही देती मान - मोठ्या माणसांचा आश्रय / आधार घेणाऱ्याला कारण नसताना मोठेपणा दिला जातो.

धर्म करता कर्म उभे राहते - एखादी चांगली गोष्ट करायला जावे तर त्यातून एखादी वाईट गोष्ट (किंवा अडचण) उभी राहते.

गाड्याबरोबर नळ्याची यात्रा - मोठ्यांच्या आश्रयाने लहानांचाही फायदा होणे.

पोटी कस्तुरी वासासाठी फिरे भिरीभिरी - जवळच असलेली वस्तू शोधण्यासाठी गावभर फिरणे (किंवा स्वतःतच गुण असताना बाहेर शोधणे).

लकडी दाखवल्याशिवाय मकडी वळत नाही - दम दिल्याशिवाय शिस्त लागत नाही.

केस उपटल्याने का मढे हलके होते? - मोठ्या उपायांची जेथे गरज असते तेथे छोट्या उपायांनी काहीही फरक पडत नाही.

मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही - काही गोष्टी स्वतः अनुभवल्याशिवाय कळत नाहीत.

gkinmarathi.in

अडला नारायण गाढवाचे पाय धरी - बलाढ्य व्यक्ती गरज असताना कोणत्याही व्यक्तीकडे मदतीची याचना करू शकतो.

एका कानावर पगडी घरी बाईल उघडी - बाहेर बडेजाव पण घरी दारिद्य.

हत्तीच्या पायी येते आणि मुंगीच्या पायी जाते - वाईट गोष्टी (संकटे) लवकर येतात पण जाताना हळूहळू जातात.

आयत्या बिळावर नागोबा - एकाने केले काम मात्र लाभ घेतला दुसऱ्याने.

उचल पत्रावळी म्हणे जेवणारे किती - मुद्द्याचे काम सोडून भलतीच चौकशी करणे.

अनुभवल्याशिवाय कळत नाही, चावल्याशिवाय गिळत नाही - एखाद्या गोष्टीत सहभाग घेतल्याशिवाय (किंवा अनुभव घेतल्याशिवाय) ती गोष्ट साध्य होत नाही / समजत नाही.

गाढवाच्या पाठीवर साखरेची गोणी - एखादी गोष्ट असून उपयोग नाही तर तिचा फायदा घेता यायला हवा.

कुडी तशी पुडी - देहाप्रमाणे आहार / कर्तृत्वाप्रमाणे फळ मिळणे.

तोंड दाबून बुक्क्यांचा मार - विनाकारण शिक्षा करणे आणि त्याला प्रत्युत्तरही देऊ न देणे.

दगडापेक्षा वीट मऊ - मोठ्या संकटापेक्षा लहान संकट कमी नुकसान करते.

कधी गाडीवर नाव तर कधी नावेवर गाडी - सर्वांना प्राप्त परिस्थितीनुसार वागावेच लागते.

अती झाले गावचे अन पोट फुगले देवाचे - काम एकाचे आणि त्रास / दंड मात्र दुसऱ्याला.

खाई त्याला खवखवे - जो वाईट कृत्य करतो त्याला मनात भीती असते.

कष्ट करणार त्याला देव देणार - परिश्रम केल्यास असाध्य बाब साध्य होऊ शकते.

अडला हरी गाढवाचे पाय धरी - बुद्धीमान माणसालाही अडचणीच्या वेळी मूर्ख (कमी बुद्धीच्या) माणसाची विनवणी करावी लागते.

तोंडाला पाने पुसणे - हमी देऊन समोरच्या व्यक्तीचे काम न करणे / फसवणे.

तोबऱ्याला पुढे, लगामाला पाठीमागे - खायला पुढे आणि कामाला मागे.

खाऊन माजावे टाकून माजू नये - दान करावे पण संपत्तीचा गैरवापर करू नये.

तेल गेले तूप गेले हाती धुपाटणे आले - एकही गोष्ट पूर्ण न होणे (दोन्ही बाजूने नुकसान होणे).

राईचा पर्वत करणे - मूळ गोष्ट अगदी क्षुल्लक असता तिचा विपर्यास करून (मोठी करून) सांगणे.

अठराविश्वे दारिद्य असणे - अति दुर्बळ असणे (अत्यंत गरिबी असणे).

हत्ती गेला आणि शेपूट राहिले - कामाचा मोठा भाग पूर्ण झाला आणि फक्त थोडे शिल्लक राहिले.

## Mhani in Marathi Arth

फुले वेचली तिथे गोवऱ्या वेचणे - आयुष्यात जेथे सुख अनुभवले तेथेच वाईट दिवस पाहण्याचे नशिबात येणे.

पायलीची सामसूम आणि चिपट्याची धामधूम - मोठे शांत असताना छोट्यांचा आवाज वाढणे.

अंतकाळापेक्षा मध्यान्हकाळ कठीण - मरणापेक्षा भुकेच्या यातना कठीण असतात.

पुत्र मागण्यास गेली आणि भ्रतार (नवरा) घालवून आली - फायदा होईल म्हणून जाणे परंतु परत नुकसान करूनच येणे.

ओढाळ गुराला लोढणे गळ्याला - गुन्हेगाराला कायद्याचा वचक बसावयास हवा.

पुढे तिखट मागे पोचट - समोरून पाहिले तर फार मोठे वाटते पण प्रत्यक्षात जवळून बघितले की तसे नसते.

चालत्या गाडीला खीळ - सुरळीत चालणाऱ्या कामात अडचण निर्माण होणे.

आजा मेला नातू झाला - नुकसान झाल्यावेळी फायद्याची गोष्ट घडणे.

तळे राखील तो पाणी चाखील - एखादे काम सोपवल्यानंतर थोडा तरी स्वतःचा फायदा करून घेणे.

सारा गाव मामाचा एक नाही कामाचा - जवळ भरपूर व्यक्ती आहेत पण कोणीच उपयोगी नाही.

आधीच मर्कट तशातच मद्य प्याला - आधीच विचित्र बुद्धीचा अन अवास्तव प्रोत्साहन मिळाल्यामुळे त्याच्या चेष्टांना ऊत येतो.

बोलाचीच कढी बोलाचाच भात - कार्य न करता केवळ वायफळ बडबड करणे.

अवशी खाई तूप आणि सकाळी पाही रूप - अतिशय उतावळेपणाचे लक्षण.

कोणाच्या गाई म्हशी आणि कोणाला उठाबशी - गुन्हा एकाचा शिक्षा दुसऱ्याला.

इच्छा तसे फळ - मनात चांगले विचार ठेवून केलेले कार्य यशस्वी होतेच.

शेंडी तुटो की पारंबी तुटो - कोणत्याही परिस्थितीत कामाचा शेवट करणे.

आधणातले रडतात व सुपातले हसतात - स्वतः संकटात असतानाही दुसऱ्याचे दुःख पाहून खुप हसू येणे.

आखुडशिंगी आणि बहुदुधी - सर्व आपल्या मनासारखे व्हावे असे वाटणे (कमी त्रास आणि जास्त फायदा अशी अपेक्षा).

अति तेथे माती - कोणत्याही गोष्टीचा अतिरेक करू नये.

आईचा काळ आणि बायकोशी मवाळ - आईशी वाईट वागून बायकोला महत्त्व देणे.

कसायाला गाय धार्जिणी - गुंडांच्या पुढे लोक नमतात व पुढे पुढे करतात.

केळी खाता हरखले व हिशेब देता कचरले - कोणताही विचार न करता कर्ज करायचे व देणी वाढली की काळजी करायची (उपभोग घेताना मजा पण मोबदला देताना त्रास).

काठीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर होत नाही - जे काम पैशाने होत नाही, ते अधिकाराने होते; संपत्तीपेक्षा सत्ता असणे महत्त्वाचे ठरते.

कोल्हा काकडीला राजी - लहान माणसे लहान गोष्टींनी खुश होतात.

हृदयाचा उन्हाळा आणि डोळ्यांचा पावसाळा - बनावट रडणे, खोटे अश्रू ढाळणे.

आपण शेण खायचं अन दुसऱ्याच तोंड हुंगायचं - स्वतः वाईट कर्म करायचे अन दुसऱ्यावर संशय घ्यायचा.

बोलण्यापेक्षा मौन श्रेष्ठ - अधिक बोलण्यापेक्षा शांत राहणे (किंवा कृतीतून सिद्ध करणे) चांगले असते.

बडा घर पोकळ वासा - दिसण्यापुरती श्रीमंती पण प्रत्यक्षात तिचा अभाव.

**Marathi mhani ani Arth**

दैव देते आणि कर्म नेते - नशिबात असते पण स्वतःच्या कर्मामुळे / चुकीच्या कामामुळे तोटा होतो.

चोर नाही तर चोराची लंगोटी - भरपूर अपेक्षा असताना अल्प लाभावर (जे मिळेल त्यावर) समाधान मानणे.

ताक फुंकून पिणे - प्रत्येक छोटी गोष्ट सुद्धा काळजीपूर्वक करणे.

गाढवाचा गोंधळ लाथांचा सुकाळ - मूर्ख मनुष्य आपल्या वागण्याने सर्वदूर गोंधळ उडवतो.

ओठात एक नि पोटात एक - प्रकट करताना विचार वेगळे अन मनात काही वेगळेच विचार असणे.

जित्या हुळहुळे आणि मेल्या कानवले - जिवंत असताना दुर्लक्ष करायचे व मेल्यावर गोड कौतुक करायचे (किंवा मरणोत्तर मोठेपणा देणे).

अपयश ही यशाची पहिली पायरी आहे - कोणतेही यश मिळवताना सुरवातीला अपयश येऊ शकते.

आपलेच दात अन आपलेच ओठ - आपल्या माणसांनी आपल्याच माणसांना त्रास देणे (किंवा आपल्याच माणसाने चूक केल्यावर अडचण निर्माण होणे).

एका म्यानात दोन तलवारी राहात नाहीत - दोन तेजस्वी माणसे गुण्या-गोविंदाने राहू शकत नाहीत.

चोराची पावले चोराला ठाऊक - वाईट माणसांनाच वाईट माणसांच्या युक्त्या कळतात.

नसून खोळंबा असून दाटी - एखादी व्यक्ती/वस्तू नसल्यास काम अडून राहणे आणि असल्यास केवळ गर्दी/अडचण होणे.

जो गुळाने मरतो त्याला विष कशासाठी? - जिथे गोड बोलून काम होत असेल तिथे कठोर उपायांची गरज नसते.

ढेकणाच्या संगे हिरा जो भंगला, कुसंगे नाडला साधू तैसा - वाईट संगतीचे परिणाम वाईटच होतात.

नाचता येईना अंगण वाकडे - एखादे काम आपल्याला व्यवस्थित जमत नसेल तेव्हा आपण आपला कमीपणा लपवण्यासाठी इतर गोष्टीत चुका काढतो.

आपल्याच पोळीवर तूप ओढणे - स्वतःचाच स्वार्थ साधून घेणे.

अठरा नखी खेटरे राखी, वीस नखी घर राखी - मांजर घराचे तर कुत्रे दाराचे रक्षण करते.

दोन्ही घरचा पाहुणा उपाशी - दोन वेगवेगळ्या समूहांना पाठिंबा देणाऱ्या व्यक्तीला (किंवा दोन्ही बाजूंवर अवलंबून असणाऱ्याला) तोटा होतो.

तट्टाला टुमणी, तेजीला इशारत - मूर्खाला शिक्षा देऊन जी गोष्ट समजत नाही ती शहाण्याला इशाऱ्याने समजते.

गरजेल तो पडेल काय - फक्त तोंडाने बडबड करणाऱ्या माणसाकडून काही होत नाही.

दारात नाही आड म्हणे लावतो झाड - साधने नसताना एखादी गोष्ट हौस म्हणून करण्याची बढाई मारणे.

द्या दान सुटे गिराण (ग्रहण) - एखादा आशावाद दाखवून द्रव्याची अपेक्षा करणे.

## Mhani in marathi with Meaning

जो दुसऱ्यावर विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला - आपले काम दुसऱ्यावर ढकलले (किंवा पूर्णपणे दुसऱ्यावर अवलंबून राहिले) तर अपयश येते.

गरजवंताला अक्कल नाही - असहाय्य माणूस कोणाकडेही मदतीची याचना करतो / काहीही सहन करतो.

अंगठा सुजला म्हणून डोंगराएवढा होईल का? - कोणत्याही गोष्टीला ठराविक मर्यादा असतात.

दाम करी काम - पैशाने सर्व कामे साध्य होतात (पैशाला किंमत असते).

कोठे इंद्राचा ऐरावत, कोठे श्यामभट्टाची तट्टाणी - महान गोष्टींची तुलना क्षुल्लक गोष्टींबरोबर करणे.

गड आला पण सिंह गेला - एक महत्त्वाची गोष्ट मिळवताना दुसरी महत्त्वाची गोष्ट (किंवा व्यक्ती) दूर जाणे / गमावणे.

करीन ती पूर्व - मी करेन तेच योग्य अशा विचाराने वागणे.

मनाची नाही पण जनाची तरी असावी - एखादी वाईट गोष्ट करताना मनाला काय वाटेल याचा विचार नाही केला तरी जगाला काय वाटेल याचा विचार नेहमी करावा.

अल्प मनुष्य कोपे, लहान भांडे लवकर तापे - कमी बुद्धिमान माणूस लवकर संतापतो.

अवचित पडे आणि दंडवत घडे - स्वतःची चूक लपवण्याचा प्रयत्न करणे.

बुडत्याला काडीचा आधार - संकट काळी कुणाकडूनही मिळालेली थोडीशी मदत मोठी ठरते.

आपण हसे लोकाला अन घाण आपल्या नाकाला - ज्या दोषाबद्दल लोकास हसायचे, तोच दोष आपल्यात असताना दुर्लक्ष करणे.

दही वाळत घालून भांडणे - स्वतःचे नुकसान झाले तरी पर्वा न करता वैर करणे सुरूच ठेवणे.

लग्नाला गेली आणि बारशाला आली - खुप वेळाने (किंवा काम संपल्यावर) पोहोचणे.

नरो वा कुंजरो वा - कोणत्याही गोष्टीबाबत स्पष्ट भाष्य न करणे, केल्यास संभ्रम निर्माण करणे.

बावळी मुद्रा देवळी निद्रा - दिसण्यास अडाणी पण व्यवहारात हुशार.

दोघींचा दादला उपाशी - एकाच वेळी दोन गोष्टींवर लक्ष केंद्रित केल्यामुळे कोणताही अपेक्षित लाभ न होणे.

देव आले द्यायला अन् पदर नाही घ्यायला - नशिबात असणे पण पदरात पाडून न घेता येणे.

दुधात साखर पडणे - एकाचवेळी अनेक गोष्टीचा लाभ होणे.

कर्कशेला कलह तर पद्मिनीला प्रीती गोड - दुष्ट स्त्रीला भांडणे आवडतात, गुणवतीला प्रेम आवडते.

आपण चिंतितो एक पण देवाच्या मनात भलतेच - प्रत्येकच गोष्ट आपल्या मनासारखी होत नाही.

आखाड्याच्या मैदानात पैलवानाची किंमत - माणसाला योग्य ठिकाणीच किंमत मिळते.

जळत घर भाड्याने कोण घेणार? - नुकसानकारक / संकटग्रस्त गोष्ट कोणालाच आवडत नाही.

शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी - चांगल्याच्या बरोबर चांगल्या गोष्टी येतात.

जानवे घातल्याने ब्राह्मण होत नाही - बाहेरील दिखाव्यामुळे आतून मनुष्य ज्ञानी होत नाही.

गाव तिथे उकिरडा - सर्वदूर सारखीच परिस्थिती असते (चांगले व वाईट दोन्ही गोष्टी सगळीकडे असतात).

माकडीला बोललं, झुणकीला लागलं (किंवा लेकी बोले सुने लागे) - बोलणे एकाला अन् दुसऱ्याला लागणे.

जेवेन तर तुपाशी नाही तर उपाशी - खुप हट्टी वागणे.

## Marathi mhani funny

काखेत कळसा गावाला वळसा - जवळ असलेली वस्तू सर्वदूर शोधत फिरणे.

मारुतीचे शेपूट - सतत वाढत जाणारे (किंवा न संपणारे) काम.

या बोटाची थुंकी त्या बोटावर करणे - गंडागंडी (किंवा फसवाफसवी) करणे.

कसायाची करणी अन मानभावी बोलणी - गोड गोड बोलायचे अन निष्ठुर वागायचे.

असेल त्यादिवशी दिवाळी, नसेल त्यादिवशी शिमगा - असेल त्या दिवशी मजा करणे, नसेल त्या दिवशी बोंबलणे.

रामाशिवाय रामायण कृष्णाशिवाय महाभारत - एखाद्या कृतीत गरजेच्या गोष्टींचा / मुख्य व्यक्तीचा अभाव.

अप्पा मारी गप्पा - काही रिकामटेकडे उगाच चर्चेचे पाल्हाळ लावतात (नुसत्या गप्पा मारणे).

अवघड ठिकाणी दुखणे आणि जावई डॉक्टर - एखादी गोष्ट कोणाला सांगता येत नाही आणि सोसवत पण नाही.

कळते पण वळत नाही - चांगल्या गोष्टी कृतीत आणता येणे कठीण असते.

नाक दाबले की तोंड उघडते - एखाद्यास कोंडीत पकडून हवे ते काम करवून घेता येते.

देखल्या देवा दंडवत - सहज दिसला म्हणून विचारणा करणे (किंवा सहज गाठ पडली म्हणून आदराने वागणे).

दोन मांडवांचा वऱ्हाडी उपाशी - दोन्ही बाजूंवर अवलंबून असणारे लोक शेवटी उपाशीच राहतात (दोन दगडांवर पाय ठेवणारे नुकसान करून घेतात).

ग ची बाधा होणे - अभिमान / गर्व चढणे.

पळसाला पाने तीनच - सगळीकडे सारखीच परिस्थिती असणे.

आयत्या पीठावर रेघोट्या मारणे - कोणतेही काम न करता दुसऱ्याच्या जिवावर उपभोग घेणे.

उसाच्या पोटी कापूस - सद्‌गुणी माणसाच्या पोटी दुर्गुणी लेकरू.

आकांक्षापुढती गगन ठेंगणे - आशावाद / प्रबळ इच्छाशक्ती ठेवल्यास कोणतेही लक्ष्य साध्य होते.

gkinmarathi.in

दात आहेत तर चणे नाहीत, चणे आहेत तर दात नाहीत - एक गोष्ट असली तरी तिच्या जोडीला पाहिजे ती गोष्ट नसणे (अनुकूलतेचा अभाव).

आधीच तारे त्यात गेले वारे - विचित्र व्यक्तीच्या वर्तनात भर पडणारी घटना घडणे.

आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास - अगोदरच आळशी असणाऱ्या माणसांच्या बाबतीत अजुन आळशी अवस्था निर्माण होणे.

अडाण्याचा गेला गाडा, वाटेवरची शेते काढा - मूर्ख माणूस कोणत्याही प्रकारे विचित्र वर्तन करू शकतो.

नाव सोनुबाई अन हाती कथलाचा वाळा - नावाप्रमाणे महती नसणे.

**Marathi mhani with Sentences**

कोळसा उगाळावा तितका काळाच - वाईट गोष्टीबाबतीत जितकी जास्त चर्चा करावी तितकीच ती अधिक वाईट होते.

पायाची वहाण पायीच बरी - ज्या त्या माणसाला त्याच्या योग्यतेनुसार / जागेनुसार वागणूक दिली पाहिजे.

अन्नछत्री जेवणे, वर मिरपूड मागणे - एखाद्याची ठराविक गोष्टीसाठी मदत घ्यायची आणि त्याच बरोबर अजुन भरपूर गोष्टींसाठी परत त्याच्यापुढे हात पसरायचे.

लोका सांगे ब्रह्मज्ञान स्वतः मात्र कोरडे पाषाण - लोकांना सल्ले द्यायचे पण स्वतः मात्र त्याप्रमाणे वागायचे नाही.

नाव मोठे लक्षण खोटे - दिखावा खूप मोठा पण प्रत्यक्षात मात्र कृती/लक्षणे अगदी विरुद्ध असणे (किंवा श्रीमंत असण्याचा केवळ आव आणणे).

ऐकून घेत नाही त्याला सांगू नये काही - जो ऐकत नाही त्याला समजावण्याचा प्रयत्न करू नये.

एका पिसाने मोर होत नाही - थोड्याशा यशाने जास्त हुरळून जाऊ नये (किंवा गर्विष्ठ होऊ नये).

आंधळीपेक्षा तिरळी बरी - एखादी बाब अगदीच वाईट स्वीकारण्यापेक्षा थोडी दोष असलेली गोष्ट स्वीकार करणे कधीही चांगले.

कुठेही जा पळसाला पाने तीनच - सर्वत्र परिस्थिती सारखीच असते.

पदरी पडले पवित्र झाले - आहे त्या गोष्टीत समाधान मानणे.

तवा तापला तोवर भाकरी भाजून घ्यावी - जोवर लाभ घेता येतो तोपर्यंत स्वार्थ साधून घेणे.

तीन दगडात त्रिभुवन आठवते - संसार केल्यावरच खरे मर्म (किंवा कष्ट) कळते.

कधी तुपाशी तर कधी उपाशी - दररोजचा दिवस सारखा नसतो.

अडली गाय खाते काय - गरजू माणूस कोणत्याही अटी स्वीकारून काम करतो.

तरण्याला लागली कळ अन म्हाताऱ्याला आलं बळ - तरुण माणूस आळशी असतो अन पोक्त माणूस काम करतो.

हलवायाच्या घरावर तुळशीपत्र - स्वतःच दुसऱ्याची वस्तू तिसऱ्याला नेऊन देणे (किंवा दुसऱ्याच्या पैशावर औदार्य दाखवणे).

आंधळी पाण्याला गेली अन घागर फोडून घरी आली - अक्षम व्यक्तीस काम दिल्यास ते तडीस जाणे कठीण असते (किंवा नुकसान होते).

नाकापेक्षा मोती जड होणे - हाताखालच्या व्यक्तीने किंवा गोष्टीने डोईजड होणे.

आयजीच्या जीवावर बायजी उदार - दुसऱ्याचा पैसा खर्च करून औदार्य दाखवणे.

उंबर पिकले आणि नडगीचे (अस्वलाचे) डोळे आले - फायदा घेण्याची वेळ येणे; पण आस्वाद न घेता येणे.

गावात घर नाही अन रानात शेत नाही - कफल्लक असणे, अत्यंत दरिद्री असणे.

घरात नाही एक तीळ अन मिशाला पीळ - गरीब (किंवा ऐपत नसताना) श्रीमंतीची ऐट करणे.

अंगाचा तीळ-पापड होणे - खूप संतापणे.

**Marathi mhani list**

वारा पाहून पाठ फिरवावी - वातावरण / परिस्थिती पाहून वागावे.

केव्हाच नाही त्यापेक्षा उशीर बरा - अशक्य गोष्ट उशिरा हाती घेतलेली बरी.

आपली पाठ आपणास दिसून येत नाही - आपले दोष आपल्याला दिसत नाहीत.

घरात नाही कौल अन रिकामा डौल - गरीब (किंवा ऐपत नसताना) श्रीमंतीची ऐट करणे.

करून करून भागले अन देवपूजेला लागले - वाईट गोष्टींचा वीट आल्यावर चांगल्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करणे.

हत्तीच्या दाढेत जिऱ्याचा दाणा - मोठ्या उपायांची गरज असताना अतिशय छोटे उपाय करणे.

असंगाशी संग प्राणाशी गाठ - अयोग्य (वाईट) माणसाची संगत धरल्यास प्राणही जाऊ शकतो.

ओझे उचलू तर म्हणे बाजीराव कोठे? - काम सोडून नुसत्या चौकशा करणे.

घोडं चाललंय मराया अन बसणारा म्हणतो मी नवा - दुसऱ्याचे दुःख न पाहता आपलाच विचार करणे (किंवा संकटाची जाणीव नसणे).

आंधळ्या बहिऱ्यांची गाठ - एक काम करण्यासाठी दोन असमर्थ माणसांची भेट होणे.

काळी बेंद्री एकाची अन सुंदर बायको लोकाची - सर्वांना आपल्या गोष्टीपेक्षा इतरांच्या गोष्टी चांगल्या आहेत असे वाटते.

हत्ती बुडतो अन् शेळी ठाव मागते - ज्या गोष्टी करण्यासाठी मोठे धडपडतात तिथे लहान लोक उड्या मारतात.

चोर सोडून संन्याशालाच फाशी - खरा अपराधी सोडून निरपराधी माणसाला शिक्षा देणे.

चोराच्या उलट्या बोंबा - गुन्हा करूनही तो कबूल न करता समोरच्यास दोषी ठरवणे (स्वतःची चूक लपवण्यासाठी आरडाओरडा करणे).

असंगाशी संग आणि प्राणाशी गाठ - पापी माणसाची दोस्ती केल्यास स्वतःच्या जीवालाही धोका निर्माण होतो.

कडू कारले तुपात तळले, साखरेत घोळले तरी ते कडू ते कडूच - वाईट व्यक्तीची वाईट सवय कधीही जात नाही.

हिरा तो हिरा गार ती गार - गुणी माणसाचे गुण कधीच लपत नाहीत.

जळतं घर भाड्याने कोण घेणार? - नुकसान देणाऱ्या गोष्टींना कोण स्वीकारणार?

यज्ञास बळी बोकडाचा - दुर्बळ व्यक्तीलाच नेहमी संकटात पुढे केले जाते किंवा बळी दिले जाते.

केळीला नारळी अन घर चंद्रमौळी - खुप दारिद्र्याची बिकट अवस्था येणे.

भरल्या गाड्यास सूप जड नाही - समर्थ व्यक्तीला छोटे काम विशेष (किंवा ओझे) वाटत नाही.

दिवस गेला रेटारेटी, चांदण्यात कापूस वेची - दिवसभर वेळ वाया घालवून रात्री (शेवटच्या क्षणास) कामासाठी धावपळ करणे.

चिंता परा येई घरा - दुसऱ्याचे वाईट चिंतित राहिले की कधीतरी आपल्यावरच उलटते.

साप साप म्हणून भुई धोपटणे - संकट नसताना त्याचा आभास करणे.

खोट्याच्या कपाळी गोटा - खोटेपणा वाईट गोष्टीकडे परावर्तित करतो (किंवा खोटे बोलणाऱ्याचे नुकसान होते).

तू दळ माझे आणि मी दळते गावच्या पाटलाचे - आपले काम दुसऱ्याने करावे आणि आपण मात्र गावचे काम करावे.

आपला हात जगन्नाथ - आपल्या कर्तृत्वावर आपली प्रगती अवलंबून असते.

दहा गेले पाच उरले - अवसान गळणे, आत्मविश्वास कमी होणे (किंवा आयुष्याचा बहुतांश काळ संपून थोडाच काळ उरणे).

आग खाईल तो कोळसे ओकेल - जसे कृत्य तसे फळ.

बैल गेला अन झोपा केला - एखाद्या गोष्टीचे महत्त्व संपल्यानंतर त्यासाठी उपाययोजना करणे व्यर्थ आहे.

मुंगीला मुताचा पूर - काही लोकांना छोटे संकटही डोंगराएवढे वाटते.

चोराच्या मनात चांदणे - वाईट कृत्य करणाऱ्याला आपले कृत्य उघडकीला येईल की काय अशी सतत भीती असते.

ओसाड रानात एरंडाचा उदो उदो - अशिक्षित गावात कमी शिकलेला माणूस विद्वान ठरतो.

आत्याबाईला जर मिशा असत्या तर - कोणत्याही कामात नसत्या विचारांची भर टाकणे (किंवा 'जर-तर' च्या अशक्य गोष्टींबद्दल विचार करणे).

अंगापेक्षा बोंगा मोठा - मूळ वस्तूंपेक्षा इतर गोष्टींचा बडेजाव मोठा असणे.

रोज मरे त्याला कोण रडे - तीच तीच गोष्ट वारंवार होऊ लागली म्हणजे तिच्यातील स्वारस्य (किंवा गांभीर्य) नष्ट होते व तिच्याकडे कोणीही लक्ष देत नाही.

## मराठी म्हणी आणि त्यांचे अर्थ

असतील शिते तर जमतील भुते - संपत्ती असलेल्या व्यक्तीकडे सर्वजण येतात.

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात - लहान वयातच मुलाच्या भावी गुणदोषांचे दर्शन होते.

नराचा नारायण बनणे - सत्कर्म करून उच्च पदावर पोहोचणे.

यथा राजा तथा प्रजा - सामान्य लोक नेहमी मोठ्यांची नक्कल करतात (किंवा जसा पुढारी तशी जनता).

आवळा देऊन कोहळा काढणे - स्वार्थ साधण्यासाठी लहान वस्तू देऊन मोठी वस्तू मिळविणे.

खऱ्याला मरण नाही - खरे एक दिवस सर्वांच्या समोर येते.

गोरा गोमटा कपाळ करंटा - नुसते दिखाऊपण काही कामाचे नसते (किंवा दिसायला सुंदर पण नशिबाने दुर्दैवी).

जलात राहून माशाशी वैर करू नये - ज्यांच्या बरोबर रहावे-जगावे लागते त्यांच्याशी शत्रुत्व करू नये.

दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ दिसते; पण आपल्या डोळ्यातले मुसळ दिसत नाही - दुसऱ्याचा छोटासा दोष दिसतो; पण स्वार्थामुळे स्वतःच्या मोठ्या दोषांकडे लक्ष जात नाही.

भित्र्या पाठी ब्रह्मराक्षस - भित्रा माणूस सदैव कोणत्याही छोट्या बाबींना घाबरतो (किंवा संकटे भित्र्या माणसालाच जास्त सतावतात).

जशी देणावळ तशी धुणावळ - कामाच्या मोबदल्याच्या प्रमाणातच काम करणे.

इच्छी परा ते येई घरा - दुसऱ्याच्या बाबतीत वाईट चिंतन करणे आणि तेच आपल्या वाट्याला येणे.

जशास तसे - समोरच्या व्यक्तीच्या व्यवहारानुसार (किंवा जसा तो वागेल तसा) आपला व्यवहार ठरवणे / त्याला उत्तर देणे.

ज्या गावच्या बोरी, त्या गावच्या बाभळी - जी माणसे एकाच ठिकाणची असतात त्यांनी एकमेकांची मापे काढू नयेत (एकमेकांचे दोष एकमेकांना माहीत असतात).

केळी खाता हरखले, हिशेब देता चरकले - गोष्टीचा उपभोग घेताना मजा वाटते पण पैसे देताना जिवाची घालमेल होते.

आंधळं दळतं कुत्रं पीठ खातं - काम करावे एकाने आणि दुसऱ्याने त्याचा फायदा घ्यावा.

गर्वाचे घर खाली - गर्विष्ठ माणसाचा नेहमी शेवटी अपमानच होतो.

एकादशी अन दुप्पट खाशी - नियमांच्या विरुद्ध वर्तन करणे.

तेरड्याचा रंग तीन दिवस - कोणत्याही नवीन गोष्टीची नवलाई अगदी कमी काळ टिकते.

मनात मांडे पदरात धोंडे - मोठी स्वप्ने बघायची परंतु पदरात काहीच नाही.

बैल गेला नि झोपा केला - एखाद्या गोष्टीची निकड संपल्यावर त्या गोष्टीसाठी काम करणे.

आपल्या अळवाची खाज आपणास ठावी - आपले दोष आपल्यालाच माहीत असतात.

दुर्दैवाचे दशावतार होणे - अनेक बाजूंनी संकटे येणे.

अती झालं अन हसू आलं - एखाद्या गोष्टीचा जास्त उहापोह केला (किंवा अतिरेक झाला) तर ती गोष्ट हास्यास्पद ठरते.

लहानपण देगा देवा मुंगी साखरेचा रवा - मोठेपणा न मिरवता छोटे होऊन (नम्र राहून) आपले काम परिपूर्ण करणे सुखी असते.

अती खाणे मसणात जाणे - खुप खाणे हे नाशवंताचे लक्षण असते.

दोन डोळे शेजारी, भेट नाही संसारी - जिवलग दोन व्यक्तीची भेट जवळ असूनही न होणे.

औटघटकेचे राज्य - कमी काळ टिकणारी गोष्ट.

जिकडे पोळी तिकडे गोंडा घोळी - एखाद्या ठिकाणी आपला लाभ (किंवा स्वार्थ) असेल तिथेच जास्त लक्ष देणे / पुढे पुढे करणे.

gkinmarathi.in

गतं न शौच्यम - एखाद्या गोष्टीचे महत्त्व संपल्यानंतर त्यासाठी उपाययोजना करणे व्यर्थ आहे (किंवा घडून गेलेल्या गोष्टीचा शोक करू नये).

मन जाणे पाप - आपण पाप दुसऱ्याला सांगितले नाही तरी ते आपल्या मनाला माहीतच असते.

दिव्याखाली अंधार - मोठ्या माणसातही काही दोष असतात.

काकडीची चोरी फाशीची शिक्षा - गुन्हा खूप लहान पण शिक्षा खूप मोठी असणे.

इकडे आड तिकडे विहीर - दोन्ही बाजूंनी अडचणीची परिस्थिती निर्माण होणे.

कर नाही त्याला डर कशाला? - ज्याने काही केलेच नाही त्याला भीती कशाची?

अपापाचा माल गपापा - चुकीच्या मार्गाने मिळवलेली संपत्ती लगेच नष्ट होते.

मनी वसे ते स्वप्नी दिसे - ज्या गोष्टी सतत आपल्या मनात फिरत असतात तीच गोष्ट स्वप्नात दिसते.

अपयश हे मरणाहून वोखटे - अपयश मरणापेक्षा भयंकर आणि लाजीरवाणे आहे.

दक्षिणा तशी प्रदक्षिणा - जसा मोबदला (लाभ) मिळेल त्याप्रमाणेच काम करणे.

दानवाच्या घरी रावण देव - जसा आपला स्वभाव तसे आपले श्रद्धास्थान बदलते (दुष्टांना दुष्टच लोक आवडतात).

करुन करुन भागला देवध्यानी लागला - वाईट कृत्य करून शेवटी देवा-धर्माला लागणे.

पोर होईना व सवत साहेना - आपल्याकडून काही होत नाही व दुसऱ्यालाही करू द्यायचे नाही.

दात कोरून पोट भरणे - मोठ्या व्यवहारात क्षुल्लक काटकसर करणे (किंवा उदरनिर्वाहासाठी फार कंजुषी करणे).

अनोळख्याला भाकरी द्यावी पण ओसरी देऊ नये - अपरिचित माणसाशी अधिक सलगी करू नये.

ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी - आपल्यावर जो उपकार करतो त्याचे गुणगान गावे.

एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरु मारु नये - दुसऱ्याने केलेल्या वाईट गोष्टींचे समर्थन करून आपणही तीच गोष्ट करू नये.

काळ आला होता पण वेळ आली नव्हती - मरण समोर उभे असताना थोडक्यात बचावणे.

औषधा वाचून खोकला गेला - परस्पर संकट टळले.

गाय व्याली, शिंगी झाली - आकस्मित घटना घडणे.

काल मेला आणि आज पितर झाला - अतिशय लगबगीचे लक्षण.

ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी - एकाच प्रदेशातील / वातावरणातील लोक एकमेकांचे गुणदोष ओळखून असतात.

झाकली मूठ सव्वा लाखाची - वाईट गोष्ट / गुपीत नेहमी झाकून ठेवावे.

तुझी दाढी जळू दे पण माझी विडी पेटू दे - दुसऱ्याचे नुकसान झाले तरी चालेल पण स्वतःचा स्वार्थ साधणे.

दृष्टीआड सृष्टी - आपल्या पाठीमागे जे चालते (किंवा बोलतात) त्याकडे दुर्लक्ष करावे.

एका पुताची माय वळचणीखाली जीव जाय - एक मुलगा पोटी असून सुद्धा तो आईला सुखाने जगू देत नाही.

उडत्या पक्षाची पिसे मोजणे - सहज चालता बोलता एखाद्या गोष्टीची पारख करणे.

गाढवं मेलं ओझ्याने अन शिंगरू मेलं हेलपाट्याने - समजदार व्यक्ती काम करून आपले जीवन व्यतीत करतात, तर मूर्ख मनुष्य काम न समजल्याने विनाकारण कष्ट करून त्रस्त जगतो.

दहा गेले, पाच उरले - आयुष्य / जीवन कमी उरणे.

आशेची माय निराशा - निराशा येईल म्हणून आशा कधीही सोडू नये.

कोल्ह्याला द्राक्षे आंबटच - न मिळणारी गोष्ट आवडत नाही असे दर्शविणे.

लेकी बोले सुने लागे - एकाला उद्देशून बोलणे पण ते दुसऱ्याला लागेल (टोचेल) असे बोलणे.

वराती मागून घोडे - एखादी गोष्टीचे महत्त्व संपल्यानंतर त्यासाठी उपाययोजना करणे व्यर्थ आहे.

तीन तिघाडा काम बिघाडा - एखादे काम भरपूर जणांनी एकत्र येऊन केले तर त्यात अपयश येऊ शकते किंवा गोंधळ उडतो.

आपला तो बाब्या दुसऱ्याचं ते कारटं - स्वतःच्या चुकांकडे दुर्लक्ष करून दुसऱ्याच्या चुकांविषयी बोलणे.

उंदराला मांजर साक्ष - वाईट गोष्टीत एकमेकांची साथ देणे.

गाढवाला गुळाची चव काय - मूर्ख माणसाला चांगल्या गोष्टीची किंमत नसते.

लंका जळे आणि हनुमान बेंबी चोळे - एखाद्याचे नुकसान करून आपण काहीच केले नाही असे दर्शवणे.

घार हिंडते आकाशी परी तिचे चित्त पिल्लांपाशी - घर प्रमुखाचे (किंवा आईचे) लक्ष नेहमी आपल्या मुलांकडेच असते.

ज्याचा कंटाळा त्याचा वानोळा - जी कंटाळवाणी (किंवा नकोशी वाटणारी) बाब असते तीच नेहमी वाट्याला येणे / स्वीकारावी लागणे.

तुकारामबुवांची मेख - न सुटणारी गोष्ट / अवघड प्रश्न.

दिल्ली तो बहुत दूर है - भरपूर गोष्टी करणे बाकी आहे कारण मंजिल खुप लांब आहे (अद्याप खूप मजल मारायची आहे).

ढवळ्या शेजारी पवळ्या बांधला वाण नाही, पण गुण लागला - वाईट दोष अंगी लवकर लागतात म्हणजेच वाईट माणसांच्या संगतीने चांगला माणूसही लगेच बिघडतो.

पाप आढ्यावर बोंबलते - पाप समोर आल्याशिवाय राहत नाही.

**Marathi Mhani Va Tyanche Arth**

आंधळ्याची बहिऱ्याशी गाठ - एकमेकांना मदत न करू शकणाऱ्या व्यक्ती जवळ येणे / एकत्र येणे.

एक कोल्हा सतरा ठिकाणी व्याला - एका व्यक्तीपासून अनेक जागी अपमान होणे.

तरण्याचे कोळसे, म्हाताऱ्याला बाळसे - विरुद्ध गोष्टी होणे (अस्वाभाविक परिस्थिती).

आसू ना मासू, कुत्र्याची सासू - कोणतेही नाते नसताना उगीच जवळीक दाखवण्याचा प्रयत्न करणे.

वाचाल तर वाचाल - शिक्षण घेतले / वाचन केले तरच प्रगती होऊ शकते (किंवा टिकाव लागू शकतो).

मानेवर गळू आणि पायाला जळू - रोग एकीकडे उपाय भलतीकडे.

उठता लाथ बसता बुक्की - अनादर टाळण्यासाठी पुन्हापुन्हा दंड देणे / सतत मारझोड करणे.

गुरवाचे लक्ष नैवेद्यावर - स्वार्थी माणसाला फक्त स्वतःच्या फायद्याच्या गोष्टी लगेच दिसतात.

आधणातले रडतात अन सुपातले हसतात - दुसऱ्यांना हसताना विचार करणे क्रमप्राप्त आहे, काही दिवसांनी तशी वेळ आपल्यावरही येऊ शकते.

होळी जळाली आणि थंडी पळाली - होळी सणानंतर थंडी कमी होते.

गंगेत घोडं न्हालं - सर्व इच्छा पूर्णत्वास जाणे (काम यशस्वीरीत्या पूर्ण होणे).

कुंभारणीच्या घरातला खडा कुंभारणीचा - आपल्या वस्तूवर आपलाच हक्क प्रस्थापित करणे.

गाढवाने शेत खाल्ले, पाप ना पुण्य - वाईट व्यक्तीला (किंवा अयोग्य ठिकाणी केलेल्या मदतीचा) काहीही फायदा किंवा महत्त्व नसते.

आधीच मर्कट तशातही मद्य प्याला - आधीच करामती त्यात मद्य प्राशन केल्याने बिकट स्थिती निर्माण होणे.

चोर सोडून संन्याश्याला फाशी - अपराधी व्यक्तीस दंड न करता निष्पाप व्यक्तीला शिक्षा / त्रास देणे.

बुडत्याला काठीचा आधार - संकटग्रस्त मनुष्यास छोटी मदत सुद्धा मोठी वाटते.

नाकापेक्षा मोती जड - महत्त्वाची गोष्ट सोडून इतर दुय्यम गोष्टीला महत्त्व येणे.

गरज सरो, वैद्य मरो - गरज असेपर्यंत त्या माणसाशी संबंध ठेवणे व गरज संपल्यावर त्याला विसरून जाणे.

कानात बुगडी गावात फुगडी - आपल्या संपत्तीचे जोरा-जोरात प्रदर्शन करणे.

नव्याची नवलाई - एखाद्या नवीन गोष्टीचा उदोउदो करणे.

नवी विटी नवे राज्य - नवीन राज्यकर्ते नवीन कायदे आणतात.

बाबाही गेला दशम्याही गेल्या - एकाच वेळी दोन वेगवेगळ्या गोष्टींवर लक्ष केंद्रित केल्यावर दोन्ही गोष्टींचा लाभ न होणे (दोन्ही बाजूने नुकसान).

आईची माया अन् पोर जाईल वाया - खुप प्रेम व लाड केल्याने मुले बिघडतात.

नाकाचा बाल - अत्यंत प्रिय व्यक्ती.

अडली गाय फटके खाय - अडचणीत सापडलेल्या माणसाला हैरान करणे.

फुटका डोळा काजळाने साजरा करावा - अंगावरचा दोष मिटत नसतो तो झाकण्याचा प्रयत्न करावा.

गाढवाच्या पाठीवर गोणी - कष्टकरी माणसाला त्या कष्टाशी संबंधित लाभ मिळत नाही, तो लाभ इतरांना मिळतो (फक्त ओझे वाहण्याचे काम).

आले अंगावर घेतले शिंगावर - संकटाचा सामना धैर्याने करावा.

कावीळ झालेल्यास सर्व पिवळे दिसते - एकाच नजरेच्या दृष्टीने सर्व जगाला बघणे.

गाढवापुढे वाचली गीता, कालचा गोंधळ बरा होता - मूर्खाला कितीही समजावून सांगितले तरी त्याचा काहीच उपयोग नसतो.

बाळाचे बाप ब्रह्मचारी - निष्पाप वाटणारी व्यक्ती प्रत्यक्षात दोषी असणे (किंवा स्वतःचा संबंध नसताना फुकटचा मोठेपणा मिरवणे).

काम नाही घरी अन सांडून भरी - काम नसताना उगाच काम निर्माण करून (वाढवून) तेच काम परत परत करणे.

मेल्या म्हशीला मणभर दूध - एखाद्याचे मेल्यावर कौतुक करणे.

आंधळ्या प्रजेत हेकणा राजा (किंवा वासरात लंगडी गाय शहाणी) - असहाय्य / अडाणी लोकांमध्ये एखादा कमी शहाणा माणूसही हुशार समजला जातो (किंवा चुकीचे निर्णय घेऊन राज्य करतो).

गाजराची पुंगी वाजली तर वाजली, नाहीतर मग मोडून खाल्ली - एखाद्या गोष्टीचा उपयोग आपल्या अपेक्षेप्रमाणे झाला तर ठीक, नाहीतर तिचा अन्य तऱ्हेने उपयोग करणे.

लाज नाही मला कोणी काही म्हणा - जो माणूस निर्लज्ज असतो तो दुसऱ्याने केलेल्या टीकेची पर्वा करत नाही.

अन्नाचा येते वास, कोरीचा घेते घास - एखादे अन्न खुप आवडते पण त्याच्यात चूका काढणे.

अतिशहाणा त्याचा बैल रिकामा - जी माणसे अति शहाणपणा करायला जातात त्यामुळेच त्यांचे ठरलेले काम सुद्धा होत नाही.

नेसेन तर पैठणी (शालू) च नेसेन, नाही तर नागवी बसेन - स्वतःचा हट्ट पूर्ण करणे.

रडत राऊत घोड्यावर स्वार - इच्छा नसताना एखादे काम करावे लागणे.

तेल गेले तूप गेले हाती आले धुपाटणे - एकाच वेळी दोन वेगवेगळ्या गोष्टींवर लक्ष केंद्रित केल्यावर दोन्ही गोष्टींचा लाभ न होणे (दोन्हीकडून नुकसान होणे).

मूर्ख लोक भांडते वकील घर बांधते - भांडण दोघांचे अन् लाभ तिसऱ्याला.

आधी पोटोबा मग विठोबा - पहिले पोट नंतर देव धर्म.

जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे - दुसऱ्याच्या परिस्थितीत आपण जावे तेव्हा तिचे खरे ज्ञान समजते.

दस की लकडी एक का बोजा - सर्वांच्या सहकार्याने मोठे काम अगदी सहजरीत्या पूर्ण होते.

न कर्त्याचा वार शनिवार - काम न करणारा व्यक्ती फक्त बहाणे सांगतो.

चोराच्या वाटा चोरालाच माहीत - वाईट कृत्य करणाऱ्या व्यक्तीस त्याचे मार्ग व स्रोत माहिती असतात (किंवा एका लबाडाची युक्ती दुसऱ्या लबाडालाच समजते).

करवतीची धार पुढे सरली तरी कापते मागे सरली तरी कापते - काही गोष्टी केल्या तरी तोटा होतो, नाही केल्या तरी तोटा होतो.

ओळखीचा चोर जीवे मारी - एखाद्याला आपण गुन्हा करताना पाहिले तर तो आपल्या जिवावर उठतो (किंवा ओळखीचा शत्रू जास्त घातक असतो).

अगं अगं म्हशी, मला कुठे नेशी? - स्वतःचीच चूक करून ती दुसऱ्याच्या माथी मारून मोकळे होणे.

हात ओला तर मित्र भला - तुमच्यापासून काहीतरी मिळणार असेल तर लोक तुमच्याशी गोड वागतात.

एका खांबावर द्वारका - एकाच माणसावर सर्व जबाबदाऱ्या असणे/देणे.

थेंबे थेंबे तळे साचे - सुरुवातीला क्षुल्लक वस्तूंचा केलेला संग्रह कालांतराने मोठा साठा बनतो.

कोंबडं झाकलं तरी तांबडं उगवल्याशिवाय राहत नाही - सत्य कधीही लपत नाही (होणारी घटना टळत नाही).

ढवळ्याशेजारी बांधला पवळ्या, वाण नाही पण गुण लागला - दोन व्यक्ती सोबत राहताना एकमेकांच्या सवयी लागतात.

जिच्या घरी ताक तिचे वरती नाक - समर्थ व्यक्ती आपल्या संपत्तीचा बडेजाव करतो.

जळी स्थळी काष्ठी पाषाणी असणे - सर्वदूर (सगळीकडे) असणे / परमेश्वराचे सर्वव्यापी असणे.

अतिपरिचयात अवज्ञा - खुप निकटता झाल्यास अपमान होऊ शकतो.

ज्याचं जळतं त्यालाच कळतं - आपले दुःख (किंवा त्रास) आपल्यालाच सोसावे लागते, इतरांना त्याची तीव्रता समजत नाही.

उद्योगाचे घरी रिद्धी सिद्धी पाणी भरी - जेथे उद्योग असतो तेथेच लक्ष्मी (संपत्ती) येते.

ईश्वर जन्मास घालतो त्याचे पदरी शेर बांधतो - प्रत्येक जन्मास आलेल्याचे पालन पोषण होतेच.

एका कानाने ऐकावे दुसऱ्या कानाने सोडून द्यावे - ऐकलेल्या सगळ्याच गोष्टींचा विचार करणे व्यर्थ आहे.

लहान तोंडी मोठा घास - छोट्या व्यक्तीने आवाक्याबाहेरच्या गोष्टी करणे किंवा मोठ्या माणसांपुढे शहाणपणा शिकवणे.

दिल चंगा तो कठौती में गंगा - आपले मन साफ असल्यास पवित्र गंगाही तिथेच पावन होते.

वाड्याचे तेल वांग्यावर (किंवा आगीचे तेल वांग्यावर) - एका गोष्टीचा राग दुसऱ्यावर काढणे.

राजा उदार झाला हाती भोपळा दिला - आशा असताना एखाद्या मोठ्या व्यक्तीने अपेक्षेनुसार काम न करणे (मोठा गाजावाजा करून क्षुल्लक मदत करणे).

## मराठी म्हणी व त्यांचे अर्थ व वाक्यात उपयोग

दिवस बुडाला मजूर उडाला - रोजाने काम करणारा स्वतःचे समजून कधीच काम करणार नाही, कामाची वेळ संपताच तो निघून जाणार.

नव्याचे नऊ दिवस - नवीन गोष्टीचे आकर्षण थोडेच दिवस टिकणे.

एरंडाचे गुऱ्हाळ - एखादी गोष्ट लांबलचक व कंटाळवाणी सांगणे.

ढवळ्या जातो आणि पवळ्या येतो पण सावळा गोंधळ तसाच राहतो - कारभारी व्यक्ती बदलली तरी फारसे बदल होत नाहीत अन तोच तो गोंधळ उडतो.

'भ' चा 'मा' करणे - सांगताना एखाद्या मूळ गोष्टीत बदल करून आपला स्वार्थ साधणे / विपर्यास करणे.

विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर - फिरत्या माणसाचा ठावठिकाणा लागणे मुश्कील असते (किंवा आपली सर्व मालमत्ता सोबत घेऊन फिरणे).

दहा मरावे पण दहांचा पोशिंदा मरु नये - महत्त्वाची (किंवा पालनपोषण करणारी) व्यक्ती गेली तर फार मोठे नुकसान होते.

काट्यावाचून गुलाब नाही - चांगली गोष्ट कठीण परिश्रमाने मिळते.

खिळ्यासाठी नाल गेला अन नालीसाठी घोडा - व्यवस्थित नियोजन नसल्याने अतोनात नुकसान होणे.

कांदा पडला पेवात, पिसा हिंडे गावात - एखाद्या गोष्टीचा चुकीच्या मार्गाने शोध घेण्याचा प्रयत्न करणे.

खाऊ जाणे तो पचवू जाणे - एखादे काम धाडसाने करणारा त्याचे परिणाम भोगण्यासही तयार असतो.

फासा पडेल तो डाव राजा बोलेल तो न्याय - सत्ताधाऱ्याने दिलेला निर्णय जरी अमान्य असेल तरी तो मानावा लागतो.

गरजवंताला अक्कल नसते - गरजू व्यक्तीला दुसऱ्याचे बोलणे व वागणे काहीही न बोलता सहन करावे लागते.

बैल गेला आणि झोपा केला - एखादी गोष्ट घडून गेल्यावर त्यावर उपाययोजना करण्यासाठी केलेले प्रयत्न निष्फळ ठरतात.

घोंगडे भिजत पडणे - एखादी गोष्ट खूप दिवसांपासून प्रलंबित असणे / रखडणे.

काजव्याचा उजेड त्याच्या अंगाभोवती - गोष्टींचा प्रभाव स्वतःपुरताच राहणे.

**Marathi mhani images**

दुभत्या गाईच्या लाथा गोड - पुढे जाऊन ज्याच्यापासून काही फायदा होणार आहे, त्याचा त्रासदेखील मनुष्य आनंदाने सहन करतो.

वाळूचे कणही रगडता तेलही गळे - कठोर परिश्रमामुळे कोणतीही अशक्य वाटणारी गोष्ट साध्य होऊ शकते.

उभ्याने यावे आणि ओणव्याने जावे - ताठ मानेने येणे आणि मान खाली घालून जाणे.

दैव देते कर्म नेते - नशिबाने दिलेल्या चांगल्या गोष्टीचे स्वतःच्या वाईट कर्मामुळे नुकसान होणे.

म्हातारीने कोंबडे झाकले (किंवा लपवले) म्हणून उजडायचे राहत नाही - ज्या गोष्टी होणे अटळ असतात त्या कोणाच्या थांबवल्याने थांबत नाहीत.

दैव नाही लल्लाटी, पाऊस पडतो शेताच्या काठी - जर नशिबात नसेलच तर तोंडासमोरील घास सुद्धा दूर जातो.

आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन - अपेक्षेपेक्षा जास्त लाभ होणे.

जशी नियत तशी बरकत - आपले यश आपल्या चांगल्या विचारांवर (आणि हेतूवर) अवलंबून असते.

सगळेच मुसळ केरात - केलेले सर्व परिश्रम वाया जाणे.

**Marathi mhani tcs pattern**

आपल्या गल्लीतच कुत्रे शिरजोर - आपल्या भागात आपला वरचष्मा ठेवणे (किंवा स्वतःच्याच हद्दीत शूरपणा दाखवणे).

आत्याबाईला मिशा असत्या तर तिला काकाच म्हटले असते - अशक्य गोष्टीची चर्चा करण्यात काही अर्थ नसतो.

आग रामेश्वरी बंब सोमेश्वर - रोग एकीकडे इलाज दुसरीकडे.

खिशात नाही दमडी अन बदलली कोंबडी - ऐपत नसताना बडेजाव दाखवणे.

ऐरावत रत्न थोर त्यासी अंकुशाचा मार - मोठ्या व्यक्तीला तेवढ्याच यातना होतात जेवढ्या की सामान्य व्यक्तीला.

ऐंशी तेथे पंचाऐंशी - उधळेपणाची कामे.

ऐकावे जनाचे करावे मनाचे - जगाचे ऐकून घ्यावे पण मनाला जे योग्य वाटेल ते करावे.

चिंती परा ते येई घरा - दुसऱ्याचे वाईट चिंतन केले की तशीच घटना आपल्या आयुष्यात घडते.

आकारे रंगती चेष्टा - माणसाच्या बाह्य स्वरूपावरून त्याच्या कार्याचा (किंवा स्वभावाचा) अंदाज करता येतो (हा अर्थ मूळ म्हणीनुसार थोडा वेगळा असू शकतो, पण सर्वसाधारणपणे दिसण्यावरून व्यक्तीची ओळख असा होतो).

करावे तसे भरावे - कृती असेल त्याप्रमाणे चांगले / वाईट फळ मिळते.

सांगी तर सांगी म्हणे वडाला वांगी - अशक्य गोष्ट सांगणे.

ऊराचे खुराडे आणि चुलीचे तुणतुणे - अतिशय बिकट परिस्थिती.

एका कानाचे दुसऱ्या कानाला कळत नाही - अत्यंत गुप्तपणे आपले कार्य करणे.

आरोग्य हेच ऐश्वर्य - चांगले आरोग्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे.

अती झाले अन आसू आले - काही गोष्टींचा अतिरेक झाला की त्या त्रासदायक वाटतात.

कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही - क्षुद्र माणसाने केलेल्या दोषारोपाने थोरांचे नुकसान होत नसते.

वरातीमागून घोडे - वेळ निघून गेल्यावर काम करणे.

जिथे कमी तेथे आम्ही - जिथे गरज असेल तिथे पडेल ते काम करून समोरच्यास हातभार लावणे.

गरज ही शोधाची जननी आहे - गरजेच्या वेळी मनुष्य हर प्रकारे हवी ती गोष्ट मिळवण्याचा मार्ग शोधतो.

दाम करी काम, बिबी करी सलाम - पैसे टाकले की कोणतेही काम सहजरीत्या होते.

दुष्काळात तेरावा महिना - संकटात अधिक भर पडणे.

चिखलात दगड टाकला आणि अंगावर शिंतोडे घेतले - स्वतःच्याच तोंडाने, कृत्याने, हाताने स्वतःची बदनामी करून घेणे.

कुसंतानापेक्षा निःसंतान बरे - वाईट मुले पोटी जन्मल्यापेक्षा मुले जन्माला न आलेली चांगली.

आली चाळीशी, करा एकादशी - परिस्थितीनुसार आपल्या सवयी बदलवणे.

कुठे इंद्राचा ऐरावत कुठे शामभट्टाची तट्टाणी - बलाढ्य माणसाची तुलना दुर्बळ माणसाशी होऊ शकत नाही.

घरोघरी मातीच्या चुली - सर्वदूर सारखीच परिस्थिती असते.

बाजारात तुरी आणि भट भटणीला मारी - अद्याप हातात न आलेल्या गोष्टीवरून (किंवा भविष्यातील फायद्यावरून) आधीच भांडण करणे.

आभाळ फाटल्यावर त्याला ठिगळ कसे लावायचे - मोठे संकट आले की बचाव करणे अवघड असते.

सुंभ जळाला तरी पीळ जात नाही - संपत्ती गेली तरी अकड जात नाही.

जावयाचं पोर हरामखोर - (ही म्हण सहसा वापरली जात नाही, पण अर्थानुसार) माणसाची प्रवृत्ती आपला स्वार्थ साधण्यासाठीच असते.

गावात नाही झाड अन म्हणे एरंडीला आले पान - एखादी गोष्ट उगीचच वाढवून सांगणे (किंवा क्षुल्लक गोष्टीचा बडेजाव करणे).

चुलीपुढे शिपाई अन घराबाहेर भागुबाई - घरात तेवढा शूरपणाचा आव आणायचा पण बाहेर मात्र घाबरट (भागुबाई) असणे.

दुधापेक्षा सायीवर प्रेम जास्त - मुलांपेक्षा नातवंडांवर अधिक प्रेम असणे.

जावे त्याच्या वंशा, तेव्हा कळे - एखाद्या व्यक्तीचे दुःख त्याच्या परिस्थितीत गेल्यावरच (किंवा अनुभवल्यावरच) कळते.

हातच्या काकणाला आरसा कशाला - स्पष्ट असलेल्या गोष्टीला पुरावा नको.

## Marathi Mhani with Meaning List

मऊ सापडले म्हणून कोपराने खणू नये - एखाद्याच्या चांगुलपणाचा फाजील फायदा घेऊ नये.

नावडतीचे मीठ आळणी - एखाद्या माणसाने कोणतीही गोष्ट कितीही चांगली केली तरी आपल्याला ती वाईटच दिसते कारण आपण त्याचा द्वेष करतो.

ऐकावे जनाचे पण करावे मनाचे - दुसऱ्यांचे ऐकून घ्यावे पण स्वतःचे निर्णय स्वतः घेणे.

जो खाईल आंबा तो सोशेल ओळंबा - एखाद्या गोष्टीचा लाभ घेताना त्याचे दोष / परिणामही स्वीकारावे लागतात.

डल्ला मारणे - दुसऱ्याची वस्तू चोरणे.

तळहाताने सूर्य झाकला जात नाही - छोट्या गोष्टींनी फार मोठ्या व थोर बाबी दडवता येत नाहीत.

जसा गुरु तसा चेला - एका प्रमुख व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली त्या व्यक्तीच्या स्वभावाचेच लोक निर्माण होतात.

आई जेवू घालीना बाप भीक मागू देईना - दोन्हीकडून संकटात सापडणे / दोन्ही बाजूंनी अडचण.

गोगलगाय अन पोटात पाय - बाहेरून निर्मळ दिसणारी पण मनात कपट असणारी व्यक्ती.

दाखवायचे दात वेगळे अन खायचे दात वेगळे - प्रकट करताना विचार वेगळे अन मनात काही वेगळेच विचार (दिखावा वेगळा आणि वास्तव वेगळे).

ताकापुरते रामायण - आपले काम होईपर्यंत त्याची खुशामत करणे.

कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी वाकडे ते वाकडेच - वाईट व्यक्तीची वाईट सवय कधीही जात नाही.

आपली पाठ आपणास दिसत नाही - स्वतःचे दोष स्वतःला दिसत नाहीत.

आठ पुरभय्ये नऊ चौबे - खूप मूर्ख लोकांपेक्षा कमी बुद्धिमान चालतील.

जपून पाऊल टाकणे - काळजीपूर्वक काम करणे.

चोराच्या हातची लंगोटी - ज्याच्याकडून काही मिळण्याची अपेक्षा नसते त्याच्याकडून थोडेतरी मिळणे.

गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ - मूर्ख माणसांच्या गोंधळात एकमेकांवर आरोप करण्यात वेळ जातो.

संन्याशाच्या लग्नाला शेंडीपासून सुरुवात - मुळापासून गोष्टीची सुरुवात करणे.

एकादशीच्या घरी शिवरात्र - एका दरिद्री माणसाचा दुसऱ्या दरिद्री माणसाला उपयोग होत नाही.

हजर तो वजीर - जो ऐन वेळेला उपस्थित असतो त्याचाच फायदा होतो.

राम कृष्ण आले गेले तरीही जग का चालायचे थांबले - व्यावहारिक बाबी कुणासाठीही थांबत नाहीत (जग कोणाशिवायही अडत नाही).

अति शहाणा त्याचा बैल रिकामा - अतिशहाण्या (किंवा शिष्ट) माणसाशी व्यवहार करताना लोक जपून वागतात, त्यामुळे त्याचे काम होत नाही / काम करणे जड जाते.

एकाने गाय मारली तर दुसऱ्याने वासरू मारू नये - एकाने वाईट गोष्ट केली तर आपल्यालाही वाईट गोष्ट करण्याचा हक्क पोहोचत नाही.

देश तसा वेश - देशानुसार (किंवा परिस्थितीनुसार) बदलणारे जीवन.

चांगल्या मनुष्याचे लेकरू नाठाळ - चांगल्या (सज्जन) व्यक्तीच्या पोटी दुर्गुणी अपत्य जन्मणे.

पाची बोटे सारखी नसतात - सर्व माणसे एकसारखी नसतात.

ताकास तूर न लागू देणे - मनातील गोष्ट कोणालाही न सांगणे / थांगपत्ता लागू न देणे.

दमडीची नाही मिळकत आणि घडीची नाही फुरसत - उत्पन्न काहीच नसताना आपण खूप व्यस्त आहे असे दर्शविणे.

समर्थाघरचे श्वान त्याला सर्व देती मान - मोठ्या व्यक्तीच्या घरच्या नोकरालाही मान द्यावा लागतो.

**Mhani in marathi police bharti**

गळ्यातले तुटले ओटीत पडले - नुकसान होता होता वाचले.

आपण सुखी तर जग सुखी - आपण आनंदात असता सर्व जग सुखी वाटणे.

देणं न घेणं आणि कंदील लावून येणं - उगाचच एखाद्याची कुरापत काढणे.

आपल्याच पोळीवर तूप ओढून घ्यायचे - इतरांचा विचार न करता स्वार्थ साधणे.

मन राजा मन प्रजा - आदेश देणारे पण आपले मन आणि त्याचे पालन करणारे ही आपलेच मन.

घोडा मैदान जवळ असणे - परीक्षा (किंवा कसोटीची वेळ) लवकरच जवळ येणे / सत्य लवकरच समोर येणे.

एका हाताने टाळी वाजत नाही - कोणत्याही भांडणात दोष एकाचा नसतो.

एकाची जळते दाढी दुसरा त्यावर पेटवू पाहतो विडी - एखाद्याच्या अडचणीच्या काळात आपला स्वार्थ साधून घेऊ नये.

जेथे पिके तेथे विकत नाही - एखादी गोष्ट विपुल प्रमाणात असलेल्या भागात त्या गोष्टीचे महत्त्व राहत नाही (स्थानिक गोष्टीला स्थानिक ठिकाणी किंमत नसते).

दैव उपाशी राही आणि उद्योग पोटभर खाई - केवळ नशिबावर अवलंबून असणारे नेहमी उपाशी राहतात, तर उद्योगी लोक पोटभर खातात.

श्रियाच्या मागोमाग 'ग' येतो - ऐश्वर्य, संपत्तीबरोबर नेहमी गर्व येतो.

गंगा वाहते तोवर हात धुवून घ्यावे - जोवर लाभ घेता येतो तोपर्यंत स्वार्थ साधून घेणे.

नावडतीचे मीठ अळणी - नावडत्या व्यक्तीने केलेली कोणतीही गोष्ट आवडत नाही किंवा चांगली वाटत नाही.

महत्त्वपूर्ण 400 म्हणी व त्यांचे अर्थ pdf सह

निर्लज्जम सदा सुखी - निर्लज्ज व्यक्तीला त्याच्या वागण्या-बोलण्याचे काहीही वाटत नाही आणि तो मजेत राहतो.

घरचा उंबरठा दारालाच माहित - घरातील गुप्त गोष्टी घरातल्या लोकांनाच माहित असतात.

मुंगीला मिळाला गहू कुठे नेऊ अन् कुठे ठेवू - छोट्याशा गोष्टीनेही हुरळून जाणे (किंवा अतिशय आनंद होणे).

सरड्याची धाव कुंपणापर्यंतच - प्रत्येकाच्या कामाची सीमा ठरलेली असते.

निंदकाचे घर असावे शेजारी - आपल्या शेजारी निंदा करणारा माणूस असावा त्यामुळे आपले दोष आपल्याला समजतात.

कोळसा उगाळावा तेवढा काळा - वाईट व्यक्तीचा अनुभव कायम वाईट असतो (किंवा वाईट गोष्टीची चर्चा जितकी करावी तितकी ती वाईटच ठरते).

धिटाई खाई मिठाई, गरीब खाई खेटे (किंवा धपाटे) - धीट किंवा श्रीमंत माणसाचे काम लगेच होते, तर गरीबाला खेटे घालावे लागतात.

का ग बाई रोड तर म्हणे गावाची ओढ - गरज नसलेल्या गोष्टींची काळजी करणे.

अर्थी दान महापुण्य - एखाद्या गरजवंत माणसाला दान दिल्यामुळे पुण्य मिळते.

आयजीच्या जिवावर बायजी उदार - दुसऱ्याचा पैसा दान करून (खर्च करून) स्वतःचा बडेजाव दाखवणे.

कणगीत दाणा तर भिल्ल उताणा - आपल्या गरजेपुरते आपल्या जवळ असले की लोक कोणाची फिकीर करत नाहीत.

कावळा बसायला अन फांदी तुटायला एकच गाठ - योगायोगाने एखादी गोष्ट घडून भलत्याच गोष्टीचा संबंध वेगळ्याच गोष्टीला लावणे.

कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ - फक्त स्वार्थासाठी दुष्ट बुद्धीने शत्रूला मदत करून आपल्याच माणसाचा तोटा करणे.

ताकास जाऊन लोटा लपवणे - एखादी गोष्ट करायची इच्छा असूनही ती लपवणे (किंवा एखादी गोष्ट मागायला जाऊन ती लपवण्याचा प्रयत्न करणे).

दिल्या भाकरीचा सांगितल्या चाकरीचा - एखादा मनुष्य फार काही अपेक्षा न ठेवता सांगितलेले तेवढेच काम निमूटपणे करतो.

जे न देखे रवी ते देखे कवी - जे स्वतः सूर्य पाहू शकत नाही ते कोणताही कवी विचारांनी पाहू शकतो.

खायला काळ भुईला भार - काम न करणारा व्यक्ती सर्वांना भारभूत वाटतो.

आपले नाक कापून दुसऱ्यास अपशकुन - दुसऱ्याचा तोटा करण्यासाठी प्रथम स्वतःचे नुकसान करून घेणे.

चोरावर मोर - एखाद्या गोष्टीच्या बाबतीत दुसऱ्यावर कडी करणे / दुसऱ्याला मात देणे.

आधी जाते बुद्धी मग जाते लक्ष्मी - आधी वर्तन बिघडते मग मनुष्य कंगाल होतो.

भरंवशाच्या म्हशीला टोणगा - पूर्ण निराशा करणे (ज्याकडून अपेक्षा होती त्यानेच भ्रमनिरास करणे).

खाण तशी माती - आई-वडिलांप्रमाणे त्यांच्या मुलांचे वागणे असणे.

कठीण समय येता कोण कामास येतो - आपल्या अडचणीच्या वेळेस कोणीही मदतीला येत नाही.

ऊस गोड लागला म्हणून मुळासगट खाऊ नये - चांगल्या गोष्टीचा प्रमाणापेक्षा जास्त फायदा घेऊ नये.

देह देवळात चित्त पायतणात - एका ठिकाणी मन एकाग्र न करता, दुसऱ्या ठिकाणी चित्त घोटाळणे.

काम न धंदा, हरी गोविंदा - रिकामटेकडा मनुष्य फक्त बडबड करण्यात आपला वेळ घालवतो.

करून गेला गाव अन दुसऱ्याचेच नाव - एकाने केलेल्या गुन्ह्याचा आरोप दुसऱ्यावर ठेवणे.

बाप तसा बेटा - वडिलांच्या अंगचे गुण पोरात उतरणे.

लंकेची पार्वती असणे - अत्यंत गरीब असणे (किंवा अंगावर एकही दागिना नसलेली स्त्री).

तळ्यात मळ्यात करणे - मनाची अवस्था अस्थिर असणे (किंवा द्विधा मनस्थिती असणे).

जात्यातले रडतात आणि सुपातले हसतात - दुसऱ्यांना हसताना विचार करणे क्रमप्राप्त आहे, काही दिवसांनी तशी वेळ आपल्यावरही येऊ शकते.

इन मीन साडेतीन - कमीत कमी लोक हजर असणे.

हात फिरे तिथे लक्ष्मी वसे - प्रयत्नशील माणसाच्या घरी लक्ष्मी आणि संपत्ती नांदते.

अंगाची लाही लाही होणे - खूप संतापणे.

## Mhani in marathi on body parts

ओठी तेच पोटी - बोलावे तसे वागावे, सरळमार्गी माणूस.

उचल पत्रावळी म्हणे जेवणारे किती? - काम सोडून भलत्याच चौकशा करणे.

काकडीची चोरी अन फाशीची शिक्षा - थोड्याशा अपराधानंतर फार मोठी शिक्षा करणे.

उचलली जीभ लावली टाळ्याला - विचार न करता बोलणे.

एकटा जीव सदाशिव - एकटा माणूस चिंतामुक्त अन सुखी असतो.

तू राणी मी राणी पाणी कोण आणी - दोघेही काम न करणारे (किंवा मोठेपणा मिरवणारे) असल्यास काम कोण करणार असा प्रश्न निर्माण होतो.

जशी कामना तशी भावना - आपण जसे चिंतन करतो (किंवा जशी इच्छा असते) त्याप्रमाणे आपले विचार (व दृष्टिकोन) बनतात.

अन्नछत्रात मिरपूड मागू नये - गरजवंत व्यक्तीला पर्याय नसतो (मोफत मिळणाऱ्या गोष्टीत अटी घालू नयेत).

डोळ्यात अंजन घालणे - एखाद्यास वास्तवाची / खरी परिस्थितीची जाणीव करून देऊन त्याची चूक सुधारणे (टीप: 'दिवसाढवळ्या फसवणे' यासाठी 'डोळ्यात धूळ फेकणे' ही म्हण वापरतात).

स्नान करून पुण्य घडे तर पाण्यात बेडूक काय थोडे - वरवरच्या दिखाव्याने पुण्य प्राप्त होत नाही.

देवाची करणी अन नारळात पाणी - नैसर्गिक गोष्टींना तोड नसते.

अंधारात केले, पण उजेडात आले - एखादी गोष्ट लपून केली परंतु काही दिवसांनी ती लोकांपुढे आली.

उकराल माती तरी पिकतील मोती - शेतीत चांगली मशागत केल्यास चांगले पीक येते.

देव तारी त्याला कोण मारी? - आपल्यावर देवाची कृपा असल्यास कोणीही आपले वाईट करू शकत नाही.

हातचे सोडून पळत्याच्या पाठी लागणे - आपल्याला मिळते ते सोडून नको त्या गोष्टींसाठी प्रयत्न करणे.

अडली गाय अन फटके खाय - अडचणीत सापडलेल्या व्यक्तीस जास्त त्रास देणे.

एका माळेचे मणी - सर्व लोक सारख्याच स्वभावाची असणे.

कानामागून आली तिखट झाली - नवीन आलेली व्यक्ती लवकरच यशस्वी होणे.

लंकेत सोन्याच्या विटा - दुसऱ्या ठिकाणी (किंवा दुसऱ्याच्या मालकीच्या) असलेल्या गोष्टींचा फायदा आपल्याला नसतो.

ज्याचे करावे बरे तो म्हणतो माझेच खरे - एखाद्याचे भले करायला जावे तर तो आपलेच म्हणणे चालवण्याचा प्रयत्न करतो.

आपले नाक कापून दुसऱ्याला अपशकुन - दुसऱ्याचे नुकसान करण्यासाठी आधी स्वतःचे नुकसान करून घेणे.

दुरून डोंगर साजरे - कोणतीही गोष्ट लांबूनच चांगली दिसते; परंतु जवळ आल्यावरच तिचे खरे रूप समजते.

असेल तेव्हा दिवाळी नाहीतरी शिमगा - भरपूर द्रव्य असल्यावर चैन करायची, नाहीतर गप्प बसायचे.

खिशात न्हाई आणा, अन ह्याला बाजीराव म्हणा - गरीब मनुष्यास कोणीही किंमत देत नाही (किंवा ऐपत नसताना मोठेपणाची अपेक्षा).

इच्छिलेले जर घडते तर भिक्षुकही राजे होते - इच्छेप्रमाणे सारे घडले तर सारेच लोक धनवान झाले असते.

एक ना धड भाराभर चिंध्या - एकाच वेळी अनेक कामे केल्याने सर्व कामे अर्धवट होतात.

अल्प बुद्धी, बहू गर्दी - कमी बुद्धीच्या माणसास खूप गर्व असतो.

ओ म्हणता ठो येईना - कसलेही ज्ञान नसणे, लिहिता वाचता न येणे.

अडाण्याची गोळी भल्यास गिळी - अशिक्षित / अडाणी माणूस कोणालाही अडचणीत आणू शकतो.

तहान लागल्यावर विहीर खोदणे - गरज लागल्यानंतरच एखाद्या गोष्टीसाठी तयारी करणे.

जखमेवर मीठ चोळणे - आधीच त्रस्त असलेल्याला परत त्याच गोष्टीविषयी त्रास देणे / दुःख वाढवणे.

गोगल गाय पोटात पाय - वरून दुर्बळ (किंवा गरीब) वाटणारे आतून कपटी / स्वार्थी असू शकतात.

जिकडे सुई तिकडे दोरा - घनिष्ठ संबंध असणारे एकमेकांजवळ कायम असतात (किंवा पुढारी जाईल तिथे अनुयायी जातात).

पै दक्षिणा लक्ष प्रदक्षिणा - पैसा (मोबदला) कमी मिळणे पण काम जास्त करणे.

काठी मारल्याने पाणी दुभंगत नाही - रक्ताची नाती बोलण्याने तुटत नाहीत.

उथळ पाण्याला खळखळाट फार - अंगी गुण थोडासा पण बढाई खुप मारणे.

मांजरीचे दात तिच्या पिल्लाला लागत नाहीत - आई-वडिलांचे टोचून बोलणे लेकराला लागत (त्रासदायक ठरत) नाही.

कवड्यांचे दान केले अन गावात नगारे वाजविले - दान छोटे करून इतर लोकांना महती सांगत फिरणे.

ओळखीचा चोर जीवे न सोडी - ओळखीचा शत्रू हा अनोळखी शत्रूपेक्षा घातक असतो.

## 20 mhani in marathi

फूल ना फुलाची पाकळी - खुप काही देण्याचे सामर्थ्य नसल्याने त्यातील थोडासा भाग देणे.

गरज सरो नि वैद्य मरो - स्वार्थी मनुष्य काम झाल्यावर दुसऱ्यांचा विचार करत नाही.

मूर्ती लहान पण कीर्ती महान - व्यक्ती छोटी असली तरी तिची कार्यक्षमता आणि मोठेपणा खूप असणे.

पी हळद आणि हो गोरी - कोणत्याही गोष्टीत उतावळेपणा / गडबड करणे.

चुकलेला फकीर मशीदीत - मनुष्य शेवटी आपल्या मूळ स्थानावर / ओळखीच्या ठिकाणी परततो.

अडक्याची अंबा आणि गोंधळाला रुपये बारा - मुख्य गोष्टीपेक्षा नको त्या गोष्टींचा खर्च जास्त असणे.

घरात घाण दारात घाण कुठे गेली गोरीपान - काम न करता फक्त दिखाऊपणा प्रदर्शित करणे.

बळी तो कान पिळी - ताकदवान मनुष्य इतर लोकांवर सत्ता गाजवतो.

एकी हेच बळ - एकत्र समुदाय कायम जिंकतो.

आपले नाही धड अन शेजाऱ्याचा कढ - आपली परिस्थिती चांगली नसताना दुसऱ्याच्या परिस्थितीविषयी कळकळ दाखवणे.

चालत्या गाडीला खीळ घालणे - एखाद्याच्या चांगल्या (किंवा सुरळीत चालणाऱ्या) कामात व्यत्यय आणणे.

जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही - वाईट व्यक्तीची वाईट सवय (किंवा मूळ स्वभाव) कधीही बदलत नाही.

नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने - काम करणाऱ्यांच्या (किंवा दोष असलेल्या व्यक्तीच्या) मार्गात अनेक अडचणी येणे.

चुकणे हा मानवाचा धर्म आहे - मनुष्य प्राणी हा चुकू शकतो (कोणतीही व्यक्ती सर्वज्ञ नसते).

संग तसा रंग - संगत असेल तसे वर्तन होते.

अंगात नाही बळ आणि चिमटा घेऊन पळ - दुर्बळ मनुष्य बलवान व्यक्तीवर सरळ हल्ला न करता छोटी खोडी काढून पसार होतो.

उंदीर गेला लुटी आणल्या दोन मुठी - मनुष्य आपल्या क्षमतेनुसार जगतो.

पाहुणी आली आणि म्होतूर लावून गेली - घरात पाहुणे म्हणून येणे आणि नुकसान करून जाणे.

चार आण्याचा मसाला बारा आण्याची कोंबडी - एखाद्या छोट्या गोष्टीची किंमत कमी आणि इतर खर्च खूप जास्त असणे (मुख्य वस्तूपेक्षा अनुषंगिक खर्च जास्त).

कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी वाकडे - माणसाचा मूळ स्वभाव कधीच बदलत नाही.

उडाला तर कावळा बुडाला तर बेडूक - गोष्टीची परीक्षा घेण्यासाठी वाट पाहणे.

पाण्यामध्ये मासा झोप घेतो कैसा जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे - अनुभवाशिवाय अक्कल येत नाही.

gkinmarathi.in

धनगराचे कुत्रे न लेंड्यापाशी ना मेंढ्यापाशी - हे लक्षण कोणत्याच कामाचे नाही (कुठल्याच उपयोगाचे नसणे).

सुरुवातीलाच माशी शिंकली - सुरवातीलाच अपशकुन.

जसा भाव तसा देव - आपली जशी श्रद्धा असेल त्याप्रमाणे आपल्याला फळ मिळेल.

आधीच आम्हाला हौस, त्यात पडला पाऊस - एखाद्या अचानक ठरलेल्या गोष्टीत बाधा उत्पन्न होणे.

ऐतखाऊ लांडग्याचा भाऊ - कष्ट न करण्याची सवय असलेला मनुष्य कुठेही आयते खायला मिळाले की डल्ला मारतो.

नकटे व्हावे पण धाकटे होऊ नये - छोट्या व्यक्तींना नेहमी कामे सांगितली जातात (किंवा सर्वांचे ऐकावे लागते).

आधी करावे मग सांगावे - कार्य तडीस गेल्याशिवाय त्याबद्दल उगाच बोलू नये.

ज्याच्या हाती ससा, तो पारधी - ज्याच्याकडे जे कर्तृत्व असते (किंवा ज्याला यश मिळते), तोच खरा विजेता.

अंथरूण पाहून पाय पसरावे - आपली ऐपत पाहून वागावे / जगावे.

पहिले पाढे पंचावन्न - भरपूर समजावून सुद्धा वाईट वागण्यात बदल न होणे (पुन्हा तीच जुनी परिस्थिती).

दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ दिसते पण स्वतःच्या डोळ्यातील मुसळ दिसत नाही - स्वतःच्या चुकांकडे दुर्लक्ष करून दुसऱ्याच्या चुकांविषयी बोलणे.

रात्र थोडी सोंगे फार - कामे खूप पण वेळ थोडा असणे.

उतावळा नवरा गुडघ्याला बाशिंग - लगबगीचे वर्तन करणे.

लग्नाला वीस तर वाजंत्रीला तीस - मुख्य गोष्टीपेक्षा नको त्या गोष्टीवर जास्त खर्च करणे.

अंगाले सुटली खाज, हाताला नाही लाज - कोणत्याही गरजू व्यक्तीला अक्कल नसते.

अंगाची तलखी होणे - खूप संतापणे / तडफड होणे.

पांचामुखी परमेश्वर - जास्त लोक जे बोलतील ते योग्य मानावे.

अवसबाई इकडे, पुनवबाई तिकडे - दोन विरुद्ध बाजू.

आपण मेल्यावाचून स्वर्ग दिसत नाही - अनुभव आल्याशिवाय शहाणपण येत नाही.

अपुऱ्या घड्याला डबडब फार - कमी बुद्धिमान माणूस आपले ज्ञान उगाच सर्व दूर सांगत सुटतो (अपुऱ्या ज्ञानाचा बडेजाव).

उचलली जीभ लावली टाळुला - कोणताही विचार न करता बोलणे.

अघटित वार्ता आणि कोल्हे गेले तीर्था - अशक्यप्राय गोष्टींची परिकल्पना.

अंगावरचे लेणे, जन्मभर देणे - सोने चांदी खरेदी करण्याकरिता कर्ज करून ठेवायचे आणि जन्मभर फेडत बसायचे.

आंधळे दळते अन कुत्रे पीठ खाते - एकाने कष्ट करायचे अन दुसऱ्याने त्याचा लाभ घ्यायचा.

बोडक्या फणसाला म्हैस राखण - आपल्याला ज्याच्यापासून भीती/धोका आहे त्याच्याकडेच आपल्या संरक्षणाची जबाबदारी देणे.

ओल्याबरोबर सुके जळते - दुष्टांच्या बरोबर राहिल्याने सज्जन माणसासही त्रास होतो.

छडी लागे छमछम विद्या येई घमघम - कठीण परिश्रम व दंड (शिस्त) यामुळेच विद्या / ज्ञान मिळते.

गरिबान खपाव, धनिकान चाखाव - दुबळ्या माणसाच्या (कष्टाच्या) जीवावर कोणीही बलाढ्य आपला फायदा करून घेतो.

वासरात लंगडी गाय शहाणी - मूर्ख लोकांमध्ये कमी बुद्धिमान मनुष्यसुद्धा प्रसिद्ध / शहाणा ठरतो.

उखळात डोके घातल्यावर मुसळाची भीती कशाला? - एखादे काम घेतल्यानंतर त्यासाठी पडणाऱ्या श्रमांचा विचार न करणे.

**English mhani with marathi meaning**

आईची माया अन पोर जाई वाया - अति लाडाने मुले बिघडतात.

गळ्यात पडले झेंड आणि हसून केले गोड - गळ्यात पडल्यावर वाईट गोष्टी सुद्धा गोड मानून घ्याव्या लागतात.

ग ची बाधा झाली - फाजील आत्मविश्वास बळावणे / गर्व चढणे.

दाखविलं सोनं हसे मूल तान्हं - पैशाचे आमिष / लालच दाखवताच अवघड कामेही लगेच होतात.

बाप से बेटा सवाई - बापापेक्षा मुलगा अधिक कर्तृत्ववान.

चोरीचा मामला हळू हळू बोंबला - वाईट गोष्ट सर्व बाजूंनी झाकण्याचा (किंवा लपवण्याचा) प्रयत्न होतो.

उभारले राजवाडे तेथे आले मनकवडे - श्रीमंती आली की तिच्या मागोमाग चमचे ही येतातच.

कशात काय अन फाटक्यात पाय - वाईटात अजुन वाईट घडणे.

नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ पाहू नये - नदीचे उगमस्थान व ऋषीचे मूळ कधीच शोधू नये कारण दोन्हींमध्ये काहीतरी दोष असू शकतो.

आलिया भोगासी असावे सादर - नशिबात आले ते स्वीकारणे.

एका माळेचे मणी ओवायला नाही कुणी - सर्व एकसारखे असताना कोणीच काम करत नाही.

आंधळा मागतो एक डोळा देव देतो दोन डोळे - मागितली एक गोष्ट पण मिळाले भरपूर.

खर्चणाऱ्याचे खर्चते आणि कोठावळ्याचे पोट दुखते - खर्च करणारा खर्च करत असतो मात्र दुसऱ्याच एखाद्याला कुरकुर लागते.

गाढवाला गुळाची चव काय? - ज्याला एखाद्या गोष्टीचा गंध नाही त्याला त्या गोष्टीचे महत्त्व कळू शकत नाही.

वळणाचे पाणी वळणावर जाणार - आयुष्यात ज्या गोष्टी घडायच्या (किंवा जसा मूळ स्वभाव असतो) तशाच घडत राहणार.

आसमान दावणे - पराजय करणे (किंवा जमीनदोस्त करणे).

वारा पाहून पाठ फिरवणे - परिस्थिती पाहून काम करणे / वागणे.

सात हात लाकूड नऊ हात ढलपी - एखादी गोष्ट खूप मोठी करून फुगवून सांगणे.

रंग जाणे रंगारी - ज्याची विद्या त्यालाच माहीत.

काडीचोर तो माडीचोर - एखाद्या छोट्या अपराधाबरोबर मोठ्या अपराधाची जोड लावणे.

राज्याचे घोडे आणि खासदार उडे - वस्तू एकाची आणि मजा दुसऱ्याची.

दुधाने तोंड भाजले की ताकपण फुंकून प्यावे लागते - एकदा अद्दल घडली की माणूस खूप सावधगिरी बाळगतो.

काय ग बाई उभी घरात दोघी तिघी - घरात काम करणारे पुष्कळ वाढले की प्रत्येकजण कामचुकारपणा करू लागतो.

ये रे माझ्या मागल्या - एखाद्याने कितीही चांगला सल्ला देऊनही पूर्वीप्रमाणेच वागणे.

तीर्थ आहे तर भट नाही, भट आहे तर तीर्थ नाही - नवरा आहे तर नवरी नाही आणि नवरी आहे तर नवरा नाही (अनुकूल परिस्थितीचा अभाव).

कामापुरता मामा - व्यावहारिक जगात स्वार्थ बाळगणे.

आमचे गहू आम्हालाच देऊ - आपल्याच वस्तूचा चतुराईने दुसऱ्यांना लाभ न मिळू देता स्वतःच लाभ घेणे.

मामुजी मेला अन् गाव गोळा झाला - लहान गोष्ट पण गावभर कालवा.

gkinmarathi.in

पडलेले शेण माती घेऊन उठते - चांगल्या माणसावर एकदा काहीतरी आरोप झाला आणि त्याने किती जरी प्रयत्न केले तरी त्याच्या जीवनावर थोडा का होईना डाग हा राहतोच.

वाऱ्यावरती वरात काढणे - स्वतः नियोजन न करता दुसऱ्यावर विसंबून महत्त्वाचे कार्य करणे.

अति राग भीक माग - क्रोधामुळे कोणतीही गोष्ट साध्य करता येत नाही (रागाचा परिणाम वाईट होतो).

आपण हसे लोकाला, शेंबूड आपल्या नाकाला - एखाद्या दोषाबद्दल दुसऱ्याला हसणे पण तोच दोष आपल्या अंगी असणे.

टाकीचे घाव सोसल्यावाचून देवपण येत नाही - कष्ट सोसल्याशिवाय फळ मिळत नाही.

दात कोरून पोट भरत नाही - मोठ्या व्यवहारात क्षुल्लक काटकसर करून चालत नाही.

एका दगडात दोन पक्षी मारणे - एकाच कार्यात दोन कामे करणे.

पुढच्यास ठेच मागचा शहाणा - समोरच्या माणसाच्या अनुभवावरून इतर लोक बोध घेतात आणि ती चूक टाळून सावधपणे वागतात.

दृष्टी आड सृष्टी - आपल्या पाहण्यापलीकडे पण जग आहे (आपल्या पाठीमागे जे घडते त्याकडे दुर्लक्ष करणे).

ज्वारी पेरली तर गहू कसा उगवणार? - वाईट गोष्टीतून चांगले किंवा चांगल्या गोष्टीतून वाईट तयार होत नसते (जसे कृत्य तसे फळ).

दे माय धरणी ठाय करणे - खूप त्रस्त / हैराण होणे.

पाण्यात राहून माशाशी वैर - ज्याच्या सान्निध्यात राहायचे आहे (किंवा जो बलवान आहे) त्याच्याशीच शत्रुत्व करणे उपयोगाचे नसते.

गरजेल तो बरसेल काय - मोठ-मोठ्या गोष्टी (बडबड) करणारे लोक मुळात काहीही काम करत नाहीत.

उधारीचे पोते सव्वा हात रिते - उधारीचा माल नेहमीच कमी भरतो.

एकदा की नाव कानफाट्या पडले की पडलेच - लोकात एकदा की नाचक्की झाली की लोक त्याच दृष्टीने पाहतात.

डोंगर पोखरून उंदीर काढणे - जास्त श्रम करून कमी फायदा होणे.

## Marathi mhani Quiz

बकरीचे शेपूट माशाही मारीना व लाजही राखीना - अशी गोष्ट जिचा काहीच फायदा नाही (निरुपयोगी वस्तू/व्यक्ती).

जो श्रमी त्याला काय कमी - कष्ट करणाऱ्या व्यक्तीस कशाचीही कमी पडत नाही.

आपलेच दात आपलेच ओठ - आपल्या जवळच्या माणसाने चूक केल्यावर आपलीच गोची होते.

कुठे राजा भोज कुठे गंगू तेली - बलाढ्य माणूस आणि दुर्बळ यांची तुलना होऊ शकत नाही.

धऱ्याला (मोरीला) बोळा व दरवाजा मोकळा - छोट्या गोष्टीची काळजी घेत असताना मोठ्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणे.

एकमेकां सहाय्य करू अवघे धरू सुपंथ - एकमेकांच्या सहकार्याने सर्वांचाच फायदा होतो.

अंत काळापेक्षा मध्यान्हकाळ कठीण - जीव जाणाऱ्या वेदनांपेक्षा भुकेच्या वेदना खुप त्रासदायक असतात.

छत्तीसाचा आकडा - विरुद्ध मत असणे / घोर शत्रुत्व असणे.

ये रे कुत्र्या खा माझा पाय - स्वतः आपणहून संकट अंगावर घेणे.

देणे कुसळाचे घेणे मुसळाचे - पैसे (किंवा मोबदला) कमी आणि काम जास्त करवून घेणे.

बाप दाखव नाही तर श्राद्ध कर - कोणत्याही गोष्टीचा पुरावा मागणे.

आपला तो बाब्या दुसऱ्याचे ते कारटे - आपले विचार हे दुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ कसे ही वृत्ती अंगी असणे.

दाणा दाणा टिपतो पक्षी पोट भरतो - कष्टकरी आपले पोट अत्यंत जिकिरीने भरतो (थोड्या थोड्या प्रयत्नांनी मोठे काम होते).

अक्कल नाही काडीची नाव सहस्त्रबुद्धे - नुसतेच नाव मोठे पण काम लक्षण खोटे.

दगडावरची रेघ - कायमची (न पुसणारी) गोष्ट / कधीही न बदलणारा निर्णय.

चोर तो चोर वर शिरजोर - गुन्हा करूनही तो कबूल न करता उलट समोरच्यास दोषी ठरवणे (किंवा अरेरावी करणे).

उडत्या पाखराची पिसे मोजणे - अगदी सहज अवघड गोष्टींचे मूल्यांकन करणे.

कानामागून आली आणि तिखट झाली - एखाद्या गोष्टीत मागून येणे आणि श्रेष्ठ होणे.

गाव करी ते राव न करी - श्रीमंत माणूस स्वतःच्या बळावर जे करू शकणार नाही ते सामान्य माणसे एकीच्या बळावर करू शकतात.

तोबऱ्याला पुढे, लगामाला मागे - फायद्याच्या (खायच्या) वेळी पुढे पुढे आणि कामाच्या वेळी मात्र मागे मागे.

कुंपणानेच शेत खाणे - रक्षणकर्त्यानेच नुकसान करणे.

नाव सगुणी अन करणी अवगुणी - नावाप्रमाणे न राहता वाईट कृत्य करणे.

उतावळी बावरी म्हाताऱ्याची नवरी - अति उतावळेपणा त्रासदायक असतो.

gkinmarathi.in